| PROF. SAMBHAJIRAO KADAM COLLEGE, DEUR (Satara) |
| --- |
| **Recognition from Rotary Club of Satara** |
| **For Corona Isolation Centre for Covid-19 Positive Patients** |

Certificate of the awards received from the recognized agency.



Rotary

Rotary

ROTARY CLUB OF SATARA

• Rotary International District 3132 • Club No. 015684 •

SERVE TO CHANGE LIVES

ROTARY CONNECTS THE WORLD

# सन्मानपत्र

प्रति,

**डॉ.भारत भोसले**

मा. प्राचार्य

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

सस्नेह नमस्कार....

रोटरी क्लब सातारा यांच्या वियमाने शनिवार दि.२४ जुलै २०२१ रोजी आयोजित ''सन्मान कार्याचा-शुभारंभ पर्वाचा'' या विशेष समारंभात आपणास सन्मानपत्र बहाल करताना आम्हास मनस्वी आनंद होत आहे.

आपल्या महाविद्यालयाने देऊर पंचक्रोशीतील ३० पेक्षा जास्त गावातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व्यक्तीमत्व विकासास चालना देण्याच्या दृष्टीकोनातून अनेक वैशिष्ट्यपूर्ण व नाविण्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थीहितैषी योजना महाविद्यालयात राबविल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आत्मनिर्भरतेसाठी, सक्षमीकरणासाठी आपले महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील राहिलेले आहे. आपल्या महाविद्यालयाने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात केलेले कार्य निश्चितच गौरवास्पद आहे. एक आदर्श आणि कर्तृत्त्वसंपन्न महाविद्यालय म्हणून महाराष्ट्रातील महाविद्यालये आपला नक्कीच आदर्श घेतील.

आपल्या महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जोपासत कोरोना आपत्तीच्या काळात कोविड १९ विलगीकरण कक्षाची स्थापना करून देऊर पंचक्रोशीतील कोविड १९ बाधित रूग्णाना दिलासा दिला. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व नैतिक मूल्ये रूजविण्याचे महत्वपूर्ण कार्य महाविद्यालयाने केलेले आहे. शिवाजी विद्यापीठ परिप्रेक्षातील स्वतः हून पुढाकार घेऊन कोवीड विलगीकरण कक्ष स्थापन करणारे हे एकमेव महाविद्यालय आहे.

तसेच आपल्या महाविद्यालयाने देऊर पंचक्रोशीतील अनेक गावांचे पालकत्व स्वीकारून महाविद्यालयाच्या माध्यमातून मास्क वाटप, सॅनिटायझर वाटप, धान्य वाटप, कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयक जनजागृती, लसीकरणविषयक जनजागृती या उपक्रमांच्या माध्यमातून देऊर परिसरातील कोविड बाधितांची रूग्ण साखळी तोडण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

आपल्या महाविद्यालयाच्या या आगळ्यावेगळ्या व राष्ट्रबांधणीस पूरक असलेल्या विशेष उपक्रमाची दखल घेऊन आम्ही आपणास हे सन्मानपत्र आदरपूर्वक प्रदान करीत आहोत.

आपल्या महाविद्यालय यापुढेही असेच राष्ट्रबांधणीचे भरीव कार्य करीत राहील असा आमचा ठाम विश्वास आहे. भविष्यातील आपल्या कार्यास व वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

रो. शशिकांत रसाळ
सचिव
रोटरी क्लब, सातारा

रो. संदीप भागवत
अध्यक्ष
रोटरी क्लब, सातारा

शनिवार, दि.२४ जुलै २०२१

स्थळ : सातारा

Rotary Club of Satara



Ideal College Award by Rotary Club of Satara

बुधवार दि.४ ऑगस्ट२०२१ ते मंगळवार दि.१० ऑगस्ट २०२१ साप्ताहिक सातारा

# रोटरी क्लब ऑफ सातारा तर्फे देऊरच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयास आदर्श महाविद्यालय पुरस्कार प्रदान

वाठार स्टे.: रोटरी क्लब ऑफ साताराच्या सत्याहत्तराव्या वर्धापदिनानिमित्त कोविड संसर्गाच्या कालावधीत महत्वपूर्णकाम करणाऱ्या देऊरच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा आदर्श महाविद्यालय म्हणून रोटरी तर्फे स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात स्वतः पुढाकार घेवून कोविड विलगिकरण कक्ष निर्माण करून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात एक आदर्श निर्माण केल्याबद्दल प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालयाचा ङ्गसन्मान कार्याचा शुभारंभ पर्वाचाफ्या विशेष समारंभात रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे नियोजित गव्हर्नर रो. रूक्मेश जाखोटिया व रोटरी क्लब सातारा चे अध्यक्ष रो. संदिप भागवत यांचे हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत भोसले सन्मानपत्र व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.




कोविड विलगीकरण कक्षाबरोबरच तसेच या महाविद्यालयाने देऊर पंचक्रोशीतील अनेक गावांचे पालकत्व स्वीकारून महाविद्यालयाच्या माध्यमातून मास्क वाटप, सॅनिटायझर वाटप, धान्य वाटप, कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयक जनजागृती, लसीकरणविषयक जनजागृती अशा अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून देऊर परिसरातील कोविड बाधितांची रूग्ण साखळी तोडण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. तसेच या परिसरातील कोवीड रुग्णांना प्रबोधनाच्या माध्यमातून दिलासा देण्याचे कार्य केलेले आहे. कोविड प्रबोधनपर कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व नैतिक मूल्ये रुजविण्याचे महत्वपूर्ण कार्य या महाविद्यालयाने केलेले आहे.या पुरस्कार सोहळ्यास सहाय्यक प्रांतपाल रो. सचिन शेळके, रोटरी क्लब ऑफ सातारा चे उपाध्यक्ष रो. अरविंद कदम, सचिव रो. शशिकांत रसाळ, नियोजित अध्यक्ष रो. शंकरराव कर्पे, कोषाध्यक्ष रो. किशोर डांगे, डॉ.अशोक शेलार, सहा.प्रा.सूर्यकांत अदाटे तसेच रोटरी क्लब ऑफ सातारा चे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. भाग्यश्री शिंदे यांनी केले.

पुण्य नगरी

# प्रा. कदम महाविद्यालयास आदर्श महाविद्यालय पुरस्कार




**सातारा : रुक्मेश जाखोटिया यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना डॉ. भारत भोसले. शेजारी संदीप भागवत व मान्यवर.**

**सातारा :** रोटरी क्लब ऑफ साताराच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त कोरोना काळात महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या देऊर, ता. कोरेगाव येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा आदर्श महाविद्यालय म्हणून स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात स्वतःहून पुढाकार घेऊन कोरोना विलगीकरण कक्ष स्थापन करून शैक्षणिक क्षेत्रात या महाविद्यालयाने एक आदर्श केलेला आहे. सातारा येथे पार पडलेल्या 'सन्मान कार्याचा शुभारंभ पर्वाचा' या विशेष समारंभात रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्टचे नियोजित गव्हर्नर रूक्मेश जाखोटिया व रोटरी क्लब साताराचे अध्यक्ष संदीप भागवत यांच्याहस्ते देऊर महाविद्यालयास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास सहायक प्रांतपाल सचिन शेळके, रोटरी क्लब ऑफ साताराचे उपाध्यक्ष अरविंद कदम, सचिव शशिकांत रसाळ, नियोजित अध्यक्ष शंकरराव कर्पे, कोषाध्यक्ष किशोर डांगे, डॉ. अशोक शेलार, सहायक प्रा. सूर्यकांत अदाटे आदी उपस्थित होते. डॉ. भाग्यश्री शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# देऊरचे प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयास आदर्श महाविद्यालय पुरस्काराने सन्मानित

▲ **पिंपोडे बुद्रुक,** दि. ३ : रोटरी क्लब ऑफ साताऱ्याच्या सत्याहत्तराव्या वर्धापदिनानिमित्त कोविड कालखंडात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या देऊरच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा आदर्श महाविद्यालय म्हणून रोटरीतर्फे स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

स्वत:हून पुढाकार घेऊन कोविड विलगीकरण कक्ष स्थापन करून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात या महाविद्यालयाने एक आदर्श केला आहे. सातारा येथे झालेल्या सन्मान कार्याचा शुभारंभ पर्वाचा या विशेष समारंभात रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे नियोजित गव्हर्नर रो. रुक्मेश जाखोटिया व रोटरी क्लब साताराचे अध्यक्ष रो. संदीप भागवत यांच्या हस्ते देऊर महाविद्यालयास प्राचार्य डॉ. भारत भोसले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




प्राचार्य डॉ. भारत भोसले यांना पुरस्कार देताना रो. संदीप भागवत, शेजारी रोटरी क्लबचे सदस्य व मान्यवर.

कोविड विलगीकरण कक्षाबरोबरच तसेच या महाविद्यालयाने देऊर पंचक्रोशीतील अनेक गावांचे पालकत्व स्वीकारून महाविद्यालयाच्या माध्यमातून मास्क वाटप, सॅनिटायझर वाटप, धान्य वाटप, कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयक जनजागृती, लसीकरणविषयक जनजागृती अशा अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून देऊर परिसरातील कोविड बाधितांची रुग्ण साखळी तोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या परिसरातील कोविड रुग्णांना प्रबोधनाच्या माध्यमातून दिलासा देण्याचे कार्य केले आहे. कोविड प्रबोधनपर कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व नैतिकमूल्ये रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या महाविद्यालयाने केले आहे. या पुरस्कार सोहळ्यास सहाय्यक प्रांतपाल रो. सचिन शेळके, रोटरी क्लब ऑफ साताराचे उपाध्यक्ष रो. अरविंद कदम, सचिव रो. शशिकांत रसाळ, नियोजित अध्यक्ष रो. शंकरराव कर्पे, कोषाध्यक्ष रो. किशोर डांगे, डॉ. अशोक शेलार, सहा. प्रा. सूर्यकांत अदाटे, रोटरी क्लब ऑफ साताराचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. डॉ. भाग्यश्री शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

# देऊरच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयास रोटरी क्लब ऑफ सातारातर्फे पुरस्कार

**वाठार स्टेशन, दि. ५ (प्रतिनिधी) -** रोटरी क्लब ऑफ साताराच्या ७७ व्या वर्धापदिनानिमित्त देऊर, ता. कोरेगाव येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाला आदर्श महाविद्यालय पुरस्कार नुकताच देण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात कोविड विलगीकरण कक्ष सुरू केल्याबद्दल या महाविद्यालयाला 'सन्मान कार्याचा, शुभारंभ पर्वाचा' या समारंभात रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे नियोजित गव्हर्नर रुक्मेश जाखोटिया व रोटरी क्लब ऑफ साताराचे अध्यक्ष संदीप भागवत यांच्या हस्ते सन्मानपत्र व पुस्कार देण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कोविड विलगीकरण कक्षाबरोबर महाविद्यालयाच्यावतीने पंचक्रोशीतील अनेक गावांचे पालकत्व स्वीकारून मास्क, सॅनिटायझर, धान्यवाटप, प्रतिबंधात्मक उपाययोजना व लसीकरणविषयी




सातारा : संदीप भागवत यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. भारत भोसले, समवेत मान्यवर.

जनजागृती करण्यात आली. देऊर पंचक्रोशीतील ३० पेक्षा अधिक गावांमधील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी महाविद्यालयाच्यावतीने वैशिष्ट्यपूर्ण व नावीन्यपूर्ण योजना राबविण्यात आल्या आहेत. महाविद्यालयाच्या उपक्रमांची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ साताराने पुरस्कारासाठी महाविद्यालयाची निवड केली. पुरस्कार वितरण सोहळ्यास सहाय्यक प्रांतपाल सचिन शेळके, रोटरी क्लब ऑफ साताराचे उपाध्यक्ष अरविंद कदम, सचिव शशिकांत रसाळ, नियोजित अध्यक्ष शंकरराव कर्पे, कोषाध्यक्ष किशोर डांगे, डॉ. अशोक शेलार, प्रा.सूर्यकांत अदाटे उपस्थित होते. डॉ. भाग्यश्री शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.